जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 NOV 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रा. मॅग्नस हयुमेलगार्ड, संशोधक डॉ. मनीषा फडतारे, डॉ. रोहन पाटील

# शिवाजी विद्यापीठात इंदिरा गांधी जयंती साजरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अहिंसा व एकतेची शपथ घेण्यात आली. यावेळी मिड स्विडन विद्यापीठाचे प्रा. मॅग्रस हयुमेलगार्ड, संशोधक डॉ. मनीषा फडतारे, डॉ. रोहन पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. तानाजी चौगुले उपस्थित होते.

22 NOV 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ-'मिड स्वीडन'मध्ये संशोधन प्रकल्प मंजूर

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठ आणि मिड स्वीडन विद्यापीठातील संशोधन प्रकल्प समाजासाठी उपयुक्त ठरेल. तसेच दोन्ही देशांतील संशोधकांना संशोधनातील नवीन संधी मिळेल, असा विश्वास प्रा. मॅग्नस हमेलगार्ड यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठ आणि मिड स्वीडन विद्यापीठ यांच्यामध्ये संयुक्त संशोधन प्रकल्प मंजूर झाला आहे. त्याअनुषंगाने मिड स्वीडन विद्यापीठाचे प्रा. हमेलगार्ड, संशोधक डॉ. मनीषा फडतारे, रोहन पाटील यांनी प्रकल्पाअंतर्गत पुढील नियोजनासाठी १९ नोव्हेंबरला विद्यापीठाला भेट दिली. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात बैठक झाली.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि मिड स्वीडन विद्यापीठातील संशोधन प्रकल्पाच्या पुढील नियोजनाबाबत बैठक झाली. त्यावेळी प्रा. मॅग्नस हमेलगार्ड, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. मनीषा फडतारे, रोहन पाटील आदी उपस्थित होते.

दोन्ही विद्यापीठांमधील या महत्त्वपूर्ण संशोधन प्रकल्पाच्या वाढीसाठी शिवाजी विद्यापीठ सहकार्य करेल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, आयक्यूएसी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, आंतरराष्ट्रीय व्यवहार कक्षाचे डॉ. शिवाजी सादळे, डॉ. कैलास सोनवणे, अनिल घुले, चंद्रकांत लंगरे, नॅक विभागाचे डॉ. सुभाष माने आदी उपस्थित होते. युसिक अधिविभागप्रमुख डॉ. ज्योतीप्रकाश यादव यांनी प्रकल्पाचा उद्देश आणि स्वरूप याची माहिती दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 NOV 2024
पुण्यनगरी

# संशोधन समाजास उपयुक्त : प्रा. हमेलगार्ड

## शिवाजी विद्यापीठ, मिड स्वीडन विद्यापीठातील प्रकल्पास मंजुरी

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठ आणि मिड स्वीडन विद्यापीठ यांच्यामध्ये संयुक्त संशोधन प्रकल्प समाजासाठी उपयुक्त ठरेल. तसेच दोन्ही देशांतील संशोधकांना संशोधनातील नवीन संधी उपलब्ध होणार आहे, असा विश्वास प्रा. मॅग्नस हमेलगार्ड यांनी व्यक्त केला. मंजूर झालेल्या संशोधन प्रकल्पाच्या अनुषंगाने मिड स्वीडन विद्यापीठाचे प्रा. हमेलगार्ड, संशोधक डॉ. मनीषा फडतारे व रोहन पाटील यांनी प्रकल्पांतर्गत पुढील नियोजनासाठी शिवाजी विद्यापीठाला भेट दिली.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहामध्ये बैठक झाली.



कोल्हापूर : मिड स्वीडन विद्यापीठाच्या संशोधकांनी शिवाजी विद्यापीठाला भेट दिली. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवर.

यावेळी दोन्ही विद्यापीठांमधील या महत्त्वपूर्ण संशोधन प्रकल्पाच्या वाढीसाठी शिवाजी विद्यापीठ सहकार्य करेल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी दिली. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, आयक्यूएसी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर, आंतरराष्ट्रीय व्यवहार कक्षाचे डॉ. शिवाजी सादळे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. अनिल घुले, डॉ. चंद्रकांत लंगरे, नॅक विभागाचे डॉ. सुभाष माने आदी उपस्थित होते. युसिक अधिविभागप्रमुख डॉ. ज्योतिप्रकाश यादव यांनी प्रकल्पाचा उद्देश आणि स्वरूप याची माहिती दिली.

22 NOV 2024 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधन समाजासाठी उपयुक्त ठरेल

■ स्विडन विद्यापीठाचे प्रा. मॅन्स् हमेलगार्ड यांचा विश्वास

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आणि मिड स्विडन विद्यापीठातील संशोधन प्रकल्प समाजासाठी उपयुक्त ठरेल. त्यांचबरोबर दोन्ही देशातील संशोधकांना संशोधनातील नवीन संधी उपलब्ध होणार आहे, असा विश्वास मिड स्विडन विद्यापीठाचे प्रा. मॅग्नस् हमेलगार्ड यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठ आणि मिड स्विडन विद्यापीठ यांच्यामध्ये संयुक्त संशोधन प्रकल्प मंजुर झाला. त्यामुळे मिड स्विडन विद्यापीठाचे प्रा. मॅग्नस् हमेलगार्ड,



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भेटीदरम्यान स्विडन विद्यापीठाचे प्रा. मॅग्नस् हमेलगार्ड, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. मनिषा फडतारे, रोहन पाटील आदी.

संशोधक डॉ. मनिषा फडतारे व रोहन पाटील यांनी प्रकल्पाअंतर्गत पुढील नियोजनासाठी विद्यापीठाला भेट दिली. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहामध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दोन्ही विद्यापीठांमधील या महत्वपूर्ण संशोधन प्रकल्पाच्या वाढीसाठी शिवाजी विद्यापीठ सहकार्य करेल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. युसिक अधिविभागप्रमुख डॉ. ज्योती यादव यांनी प्रकल्पाचा उद्देश सांगितला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. सागर डेळेकर, डॉ. शिवाजी सादळे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. अनिल घुले, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. सुभाष माने आदी उपस्थित होते.

22 NOV 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ क्रॉस कंट्री स्पर्धेमध्ये विद्यापीठाचे यश

## विजेत्या खेळाडूंचा कुलगुरूंच्या हस्ते गौरव

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : मंगळूर विद्यापीठामार्फत झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉस कंट्री स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघांनी उल्लेखनीय कामगिरी केली. यानिमित्त संघातील पदकप्राप्त खेळाडूंना डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

स्पर्धेत पुरुष विभागात देशभरातून २४७ विद्यापीठांचे पुरुष संघ सहभागी झाले होते. शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाने उल्लेखनीय कामगिरी केली. प्रधान किरुळकर याने वैयक्तिक द्वितीय क्रमांक व अभिषेक देवकाते याने वैयक्तिक तृतीय क्रमांक पटकावला, तर शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष संघाने ८९ गुणांची कमाई करत सांघिक चतुर्थ क्रमांक मिळवला. संघामध्ये प्रधान किरुळकर, अभिषेक देवकाते, प्रवीण कांबळे, उत्तम पाटील, अंकुश हाक्के, राहुल चव्हाण यांचा समावेश होता.

महिला विभागात देशभरातून १०७ विद्यापीठांचे संघ सहभागी झाले होते. शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने स्पर्धेवर आपले वर्चस्व ठेवले. सृष्टी रेडेकर हिने वैयक्तिक पाचवा क्रमांक पटकावला. महिलांच्या संघाने ६४ गुणांसह सांघिक तृतीय क्रमांक पटकावला. संघामध्ये सृष्टी रेडेकर, वैष्णवी मोरे, वैष्णवी रावळ, गायत्री पाटील, वैष्णवी सावंत, सानिका नलवडे यांचा समावेश होता.

सत्कारप्रसंगी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी, खेळाडूंना सरावामध्ये सातत्य, नियोजनबद्ध व शिस्त ठेवण्याचे तसेच येणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपसाठी तयारी करण्यासाठी प्रेरित केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा विभागप्रमुख डॉ. एस. व्ही. बनसोडे, प्रशिक्षक प्रा. रामा पाटील, प्रशिक्षक प्रा. प्रकुल पाटील-मांगोरे व संघ व्यवस्थापक डॉ. सविता भोसले, प्रा. सुचय खोपडे उपस्थित होते.



कोल्हापूर : आंतरविद्यापीठ क्रॉस कंट्री स्पर्धेत यश मिळविलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंच्या सत्कारप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व मान्यवर.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 NOV 2024
लोकमत

# क्रॉसकंट्री स्पर्धेत विद्यापीठाचे यश

कोल्हापूर : मेंगलोर विद्यापीठ यांच्यामार्फत आयोजित केलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष व महिला संघाने उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेत देशभरातून २४७ विद्यापीठांचे संघ सहभागी झाले होते. यात विद्यापीठाचा प्रधान किरूळकर याने द्वितीय क्रमांक व अभिषेक देवकाते याने तृतीय क्रमांक पटकाविला. विद्यापीठाच्या पुरुष संघाने ८९ गुणांची कमाई करत सांघिक चतुर्थ क्रमांक मिळविला. या संघात प्रधान किरूळकर, अभिषेक देवकाते, प्रवीण कांबळे, उत्तम पाटील, अंकुश हाक्के व राहुल चव्हाण यांचा समावेश होता. विद्यापीठाच्या महिला संघाने ६४ गुणांसह सांघिक तृतीय क्रमांक पटकाविला. संघात सृष्टी रेडेकर, वैष्णवी मोरे, वैष्णवी रावळ, गायत्री पाटील, वैष्णवी सावंत, सानिका नलवडे यांचा समावेश होता. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विजयी संघाचा सत्कार झाला.

22 NOV 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडा विभागाची घोडदौड कायम

## सुवर्णाक्षरांनी राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर कोरले शिवाजी विद्यापीठाचे नाव

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील क्रीडा विभागातील खेळाडूंनी अलीकडे राज्य व राष्ट्रीय पातळीवर कास्य, सुवर्णपदकाचा मान पटकावला आहे. खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारात मिळवलेल्या यशाने विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला. खेळाडूंना विद्यापीठ प्रशासनाकडून दैनंदिन भत्त्यासह अन्य सुविधाही पुरवल्या जातात. त्यामुळे सर्वसामान्य खेळाडूंना पूर्ण ताकदीनिशी खेळावर लक्ष केंद्रीत करता येते. विद्यापीठातील खेळाडूंची सुवर्णझेप विद्यापीठाच्या यशाची घोडदौड कायम ठेवणारी आहे.

क्रीडा अधिविभागामार्फत, २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिना निमित्त खाशाबा जाधव यांच्या पोस्टरचे प्रदर्शन भरवून क्रीडा दिन साजरा करण्यात आला. चालू वर्षात १०,००० खेळाडू ४६ खेळप्रकारात सहभागी होत आहेत. आंतर विभागीय स्पर्धेचे आयोजन कोल्हापूर, सांगली अणि सातारा जिल्ह्यामध्ये संलग्नित महाविद्यालयांच्या मदतीने करण्यात येत आहे. १ हजारांहून अधिक खेळाडू ६६ खेळ प्रकारामध्ये अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहेत. यावर्षी नेटबॉल महिला संघ स्पर्धेत प्रथमच सहभागी होणार आहे. ऑक्टोबरमध्ये झुंझुनु येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये कबड्डी पुरुष संघाने तृतीय क्रमांक मिळवून अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी तो पात्र झाला आहे.

विद्यापीठच्या श्रीधर निगडे व वैष्णवी पाटील (रग्बी), नंदिनी साळोखे (कुस्ती) शाहू माने (नेमबाजी) प्रतीक पाटील (सायकलिंग ) या खेळाडूंना छत्रपती क्रीडा पुरस्कार जाहीर झाला आहे. खेळाडूंना



विद्यापीठ नेहमी चांगल्या क्रीडा सुविधा देण्याचा प्रयत्न करत असते. त्याचाच एक भाग म्हणून आंतरराष्ट्रीय दर्जाचे बास्केटबॉलची तीन कोर्ट व बॅडमिंटनचे कोर्ट सुरू केले जाणार आहे. शिवकालीन युद्ध कलांचे अभ्यासक्रम सुरू झाले आहेत.

अनुष्का कुंमार हिची जागतिक ज्युनियर जागतिक अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिप, अमेरिकेतील स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली. पैलवान अमृता पुजारी हिने महिला महाराष्ट्र केसरीपद पटकावले. अमृताची आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत ७२ किलो गटात २३ वर्षाखालील जॉर्डन येथे झालेल्या आशिया चॅम्पियनशिप स्पर्धेकरिता भारताचे नेतृत्व करून कांस्यपदक जिंकले आहे. शिवाजी विद्यापीठ व कोल्हापूर जिल्हा अ‍ॅमॅच्युअर जिम्नॅस्टिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रिदमिक जिम्नॅस्टिक्सचे

■ खेळाडूंना भत्त्यासह अत्याधुनिक सुविधा उपलब्ध

प्रशिक्षण शिबिर क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर हॉल येथे झाले. या शिबिरासाठी आंतरराष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक सई खोड यांच्या मार्गदर्शनाखाली सराव शिबिर घेण्यात आले.

विद्यापीठातील क्रीडा विभागाला अत्याधुनिक खेळांची साधनसामुग्री उपलब्ध करून दिली आहे. खेळाडूंना प्रत्येक खेळाचे उत्कृष्ट प्रशिक्षण मिळत असल्याने आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये अनेक खेळाडूंनी सुवर्णपदकाची कामगिरी केली आहे. राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात दुसऱ्या क्रमांकाची जनरल चॅंपियनशिप मिळवून विद्यापीठाचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले आहे. खेलो इंडियामध्ये विद्यापीठातील २५ खेळाडूंनी विविध पदके मिळवली आहेत.

### खेळाडूंना ग्रेस गुणांची पर्वणी

विद्यापीठ प्रशासनाकडूनही परीक्षेच्या कालावधीत क्रीडा स्पर्धा सुरू असतील तर विद्यार्थ्यांना सूट देत यथावकाश खेळाडूंच्या परीक्षा घेतल्या जातात. त्याला ग्रेस गुणांचे कवच असल्याने खेळाडूंची शैक्षणिक गुणवत्ताही वाढते. विद्यापीठाने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धाचे आयोजन करून खेळाडूंना प्रोत्साहन दिले आहे.

### खेळाडू वसतिगृहाच्या बांधकामाला वेग

खेळाडू वसतिगृहाच्या बांधकामाला वेग आला असून वर्षभरात बांधकाम पूर्ण होईल. वसतिगृहात राहून पदवीपर्यंतचे शिक्षण आणि खेळाचा सराव करणे खेळाडूंना सोपे जाणार आहे. विद्यापीठ परिसरात प्रत्येक खेळाचे ग्राऊंड असल्याने खेळाडूंना प्रशिक्षणही मिळते. प्रशासन खेळाडूंच्या प्रगतीसाठी प्रयत्न करत असून, ऑलपिक क्रीडा प्रकारात खेळाडूंनी विद्यापीठाचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरावे, असा विद्यापीठाचा मानस आहे.

-डॉ. शरद बनसोडे (संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 NOV 2024
सकाळ

# 'डॉ. जे. जे. मगदूम'च्या विनीत चोपडेला ब्राँझ



विनीत चोपडे

जयसिंगपूर : शिवाजी विद्यापीठांतर्गत विभागीय वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा देवचंद महाविद्यालय अर्जुननगरच्या विद्यमाने कुरुंदवाड येथील हर्क्युलस जिम येथे झाल्या. स्पर्धेत डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचा ई. टी. सी. विभागाचा विद्यार्थी विनीत चोपडे याने ५५ किलो वजनी गटात ब्राँझपदक पटकावले. ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विजय मगदूम, उपाध्यक्षा ॲड. डॉ. सोनाली मगदूम, कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुनील आडमुठे, प्राचार्य डॉ. गोपाळ मुळगूंद यांनी विनीतचे अभिनंदन केले. विनीतला प्रा. पी. पी. पाटील, डीन विद्यार्थी कल्याण, विभागप्रमुख प्रा. एम. एम. कोलप, महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण अधिकारी प्रा. नवनाथ पुजारी यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 NOV 2024

पुण्यनगरी

# ‘डॉ. मगदूम इंजिनिअरिंग ’च्या चोपडेस ब्राँझ पदक

**जयसिंगपूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विभागीय वेटलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा देवचंद महाविद्यालय अर्जुननगरच्या विद्यमाने कुरुंदवाड येथील हर्क्युलस जिम येथे वेटलिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ई. टी. सी. विभागाचा विद्यार्थी विनीत चोपडे याने ५५ किलो वजनी गटात ब्राँझ पदक पटकावले. ट्रस्टचे चेअरमन डॉ. विजय मगदूम, व्हाईस चेअरपर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम, कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुनील आडमुठे, प्राचार्य डॉ. गोपाळ मुळगुंद यांनी विनीतचे अभिनंदन केले. त्याला प्रा. पी. पी. पाटील, डीन विद्यार्थी कल्याण, विभागप्रमुख प्रा. एम. एम. कोलप, शारीरिक शिक्षण अधिकारी प्रा. नवनाथ पुजारी यांचे मार्गदर्शन लाभले.

